**७ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बेलापुर, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, यांचे न्यायालयात,**
(पिठासीन अधिकारी— श्रीमती आर.व्ही.पाटील)

संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक: **१५४४०/२०२५**
निशाणी क्रमांक : ३

रबाळे एमआयडीसी पोलीस स्टेशन

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०६.०१.२०२५ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ०७.०१.२०२५ |
| ३. | फिर्याद/तक्रार दाराचे संपुर्ण नाव व पत्ता | : | **हुसेन हमजान तडवी, पोना/२९०५ रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई** |
| ४. | आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | कृष्णा गोपाळ खरटमोल<br>वय : २९ वर्षे,<br>रा. रूम नं १४३८, एकविरा चाळ, गणेशनगर, चिंचपाडा, दिघा, नवी मुंबई |
| ५. | अपराधाचा तपशिल | : | महाराष्ट्र दारूबंदी अधि. १९४९ चे कलम ८५(१) |

तुम्ही दिनांक ०६.०१.२०२५ रोजी २३.२० वा. च्या सुमारास तुम्ही महानगरपालिका शाळा, यादवनगर, रबाळे एमआयडीसी, नवी मुंबई येथे सार्वजनिक ठिकाणी उघडयावर दारूचे सेवन करीत असताना मिळुन आलात म्हणुन तुम्ही माझ्या अधिकार क्षेत्रात महाराष्ट्र दारूबंदी अधि. १९४९ चे कलम ८५(१) प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केलेला आहे.

वरील गून्हयासंबंधी तपशील आरोपीला मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

स्वाक्षारित/—
(श्रीमती. आर.व्ही.पाटील)
७ वे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, बेलापुर, नवी मुंबई

दिनांक : १२.०६.२०२५.
ठिकाण : बेलापुर

**आरोपीचा जवाब/म्हणणे**

**प्रश्न १** : तुम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय?

**उत्तर** : होय.

**प्रश्न २** : तुम्हाला गून्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय?

**उत्तर** : होय.

**प्रश्न ३** : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

**उत्तर** : मला गुन्हा कबूल आहे.

स्वाक्षारित/—
आरोपीची सही/अंगठा.

आरोपीस विचारणा केली असता आरोपीने स्वत: होवून व स्वईच्छेने गुन्हा कबुल करीत असल्याचे सांगितले. आरोपी स्वत: होवून गुन्हा कबुल करीत असल्याचे दिसुन आल्यामुळे आरोपीची कबुली स्विकृत करण्यात येते.

स्वाक्षारित/—
(श्रीमती. आर.व्ही.पाटील)
७ वे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, बेलापुर, नवी मुंबई

दिनांक : १२.०६.२०२५.
ठिकाण : बेलापुर

**न्यायनिर्णय**
**(दिनांक: १२/०६/२०२५ रोजी घोषित)**

रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी गु.रजि.नं. २३/२०२५, महाराष्ट्र दारूबंदी अधि. १९४९ चे कलम ८५(१) अन्वये आरोपीवर गुन्हा दाखल करून मा. न्यायालयात हजर केले होते. सदरचा गुन्हा आरोपीस कबूल आहे. आरोपी कोणत्याही दाबावाखाली सदर गुन्हयाची कबूली देत नाही असे मान्य करत आहे. सदरच्या गुन्हयाची कबूली ते स्वइच्छेने देत आहेत.

२. आज दिनांक १२.०६.२०२५ रोजी आरोपीने त्याला सदरील गुन्हा कबूल असून व सदरचा गुन्हा स्वेच्छेने कोणाच्याही दबावाशिवाय कबुल करत असल्याचे कथन केले. मी आरोपीस गुन्हा कबूल केल्यानंतर होणाऱ्या शिक्षेबाबत समजावले व आरोपी दबावाशीवाय गुन्हा कबूल करत असल्याबाबत खात्री केली. आरोपीने त्याची घरची आर्थिक परिस्थीती चांगली नसल्याने त्यास कमीत कमी दंड करण्यात यावा अशी विनंती केली.

३. आरोपीने मा. न्यायालयास विनंती केली आहे की, ते त्यांच्या कुटूंबातील एकमेव कर्ते असल्यामुळे त्यांना दया दाखविण्यात यावी व कमीत कमी दंडाची शिक्षा करण्यात यावी. तरी सदर गुन्हयाचे स्वरूप व आरोपीची विनंती पाहता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

**: आदेश :**

१. आारोपी **कृष्णा गोपाळ खरटमोल** यास महाराष्ट्र दारूबंदी अधि. १९४९ चे कलम ८५(१) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाचे आरोपाकरीता भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ अन्वये दोषी ठरवले असुन त्यांना कोर्ट उठेपर्यंत कोर्टात बसून राहण्याची शिक्षा तसेच रक्कम रूपये २,०००/— (दोन हजार मात्र) दंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे. दंड न भरल्यास ५ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२ सदर न्यायानिर्णयाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी.

स्वाक्षारित/—
(श्रीमती. आर.व्ही.पाटील)
७ वे न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
बेलापुर,

दिनांक : १२.०६.२०२५.
ठिकाण : बेलापुर